CMYK

३२वा सामना

DELHI CAPITALS Vs RAJASTHAN ROYALS

दिल्ली कॅपिटल्स् वि. राजस्थान रॉयल्स

वेळ : ७.३० वा. स्थळ : दिल्ली

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । बुधवार, दि. १६ एप्रिल २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १९७ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## नंदीमठ नगरात इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

✔ **सोलापूर :** एका ४८ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बार्शी रोडवरील नंदीमठ नगरात सोमवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. संतोष अर्जुन घुले (वय ४८, रा. १३४ नंदीमठनगर) असे गळफास घेतलेल्या इसमाचे नाव आहे. सोमवारी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास त्याच्या मृतदेह घरातील लोखंडी अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. त्याला फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. पास हवालदार रुपनुर करीत आहेत.

## 'स्मार्ट सिटी'तील तस्करी ठकसेन कोण? उत्सुकता पोहोचणार शिगेला

# महाराष्ट्र हादरवलेल्या तुळजापूर ड्रग्ज प्रकरणाशी 'सोलापूर' कनेक्शन

# आरोपींचे जबाब अन् सीडीआर माहितीवरुन सोलापूरच्या नावाचा स्फोट





✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

**राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या सर्वात मोठ्या तुळजापूर ड्रग्ज तस्करी प्रकरणात ड्रग्जच्या तस्कारीचा मार्ग राजधानी मुंबई टू तुळजापूर व्हाया सोलापूर असा झाल्याची माहिती तपासातून सकृतदर्शनी आली होती. या प्रकरणात सोलापूरचे नाव आले होते. महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या ड्रग्ज प्रकरणात तस्कारीच्या वाहतूक मार्गासाठी केवळ 'सोलापूर'चा नामोल्लेख सुरुवातीला झाला होता. तेव्हाच, याप्रकरणाशी सोलापूरचे कनेक्शन निश्चितपणे असणार, असा अंदाज होता. तो तंतोतंत खरा ठरला. या प्रकरणी धाराशिव जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल झालेल्या १० हजार पानांच्या दोषारोप पत्रात सोलापूरचा आवर्जून उल्लेख आहे. विशेषत्वे, आरोपींचे जबाब आणि सीडीआरच्या माहितीतून सोलापूरच्या नावाचा स्फोट झाला आहे. दोषारोप पत्रात अनेक गंभीर मुद्यांचा उल्लेख आहे. या प्रकरणातील आरोपींची संख्या वाढणार आहे.**





उल्लेखनीय बाब म्हणजे हादरवून टाकणाऱ्या तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात सोलापूरचे नाव आल्यानंतर या प्रकरणाशी इथले कोण ठकसेन तस्करीच्या विश्वात होते, यासंबंधीची उत्सुकता आता शिगेला पोचणार आहे. शिवाय ड्रग्ज तस्करी प्रकरणात सोलापुरातील 'त्या' ड्रग्ज बहाद्दरांची एंट्री झाली कशी? तस्करांच्या साखळीत सोलापुरातील संबंधित तरुण सहभागी कसे झाले? याची माहिती मिळणे खूप रंजक ठरणार आहे.

तामलवाडी पोलिसांनी दाखल केलेल्या दोषारोप पत्रात अनेक गंभीर मुद्यांचा उल्लेख आल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणात एकूण ३५ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. १४ आरोपींना अटक करण्यात आली. २१ आरोपी फरार आहेत. तर, ८० जणांना नोटीस बजावण्यात आली आहे.या प्रकरणात आरोपींची संख्या वाढल्याचीदेखील माहिती दोषारोप पत्राच्या अनुषंगाने, पुढे आली आहे.

- तस्करांच्या साखळीत 'शोलापूर'मधील हस्तकांची हात मिळवणी नेमकी झाली कशी?
- १० हजार पानांचे दोषारोपपत्र धाराशिव न्यायालयात दाखल
- दोषारोप पत्रात अनेक गंभीर मुद्यांचा उल्लेख
- तस्करी प्रकरणातील आरोपींची वाढणार संख्या

### दोन महिन्यांत दोषारोपपत्र; अत्यंत गंभीर भानगडी समोर

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीच्या तुळजापुरात ड्रग्ज तस्करीचे मोठे रॅकट उघडकीस आले आणि संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली. गुन्हा घडल्यापासून दोन महिन्यात म्हणजे ६० व्या दिवशी तामलवाडी पोलिसांनी धाराशिव जिल्हा व सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. १० हजार पानांचे हे दोषारोपपत्र आहे. दोषारोपपत्रात अनेक गंभीर मुद्यांचा उल्लेख करण्यात आला आहे.

### दोषारोपपत्रात मुंबई, सोलापूर, पुणे ड्रग्ज कनेक्शन असल्याचा उल्लेख

दोषारोपपत्र दाखल केले आहे. आरोपीचे जबाब, घटनास्थळ, पंचनामा, सिडीआर यासह इतर बाबींचा दोषारोप पत्रात उल्लेख करण्यात आला आहे. मुंबई, सोलापूर, पुणे येथील ड्रग्ज कनेक्शन असल्याचा ही उल्लेख या दोषारोपत्रात करण्यात आला आहे.

### १० हजार पानांच्या दोषारोपपत्रात नेमकं दडलंय तरी काय?

तुळजापूर ड्रग्ज प्रकरणात ३५ आरोपी असून आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता आहे. लाखो भाविकांच्या तुळजापुरात ड्रग तस्करीमध्ये पुजारीच पेडलर असल्याचे समोर आले होते. त्यानंतर अमली पदार्थाच्या तस्करी प्रकरणात राजकीय कनेक्शन समोर आल्यानंतर आतापर्यंत १४ आरोपींना अटक करण्यात आली असून २१ आरोपी फरार आहेत. ड्रग्ज तस्करीत कोणाचा रोल काय दोषआरोपपत्रात नमूद करण्यात आले आहे. बँक ट्रांजेक्शन, आरोपींचा एकमेकांशी संपर्क कसा झाला दोषआरोपपत्रात नमूद असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. दोषारोपपत्रात आरोपीची क्रमवारी निश्चित नाही, प्रकरणात कोणाचा रोल काय हे ठरवण्यात आल्याची माहिती आहे. ड्रग्ज प्रकरणातील आरोपी संगीता गोळे आणि इतर आरोपींचा संपर्क कसा झाला, आरोपींची साखळी कशी तयार झाली याबाबत दोषआरोपपत्रात महत्त्वाची माहिती समोर आली आहे. यात आरोपीचे जबाब, सीडीआरची माहिती तसेच मुंबई, सोलापूर, पुणे येथील तस्करी प्रकरणात संबंध असल्याची दोषारोपपत्रात माहिती आहे.

### तुळजाभवानी मातेच्या मंदिरातील पुजारी अन् राजकीय कार्यकर्ते यांच्या सहभागाने प्रकरणाला वेगळे वळण

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी इथे १५ फेब्रुवारी रोजी ड्रग्जचा मोठा साठा जप्त केला होता. तेव्हापासून ड्रग्ज तस्करीबाबत अनेक खुलासे समोर आलेत. याप्रकरणात पोलिसांनी ड्रग्ज पेडलर्सना अटक केली. त्यानंतर या ड्रग्ज विक्रीचे धागेदोरे मुंबईपर्यंत पोहचले. मुंबईतून ड्रग्ज तस्करीप्रकरणी संगीता गोळे हिला अटक करण्यात आली. विशेष पथकांची नेमणूक करत पोलिसांकडून तपास केला जातोय. यात तुळजाभवानी मंदिरातील पुजाऱ्यांच्या सहभाग असल्याने खळबळ उडाली.

### धाराशिव न्यायालयात सुनावणीला येणार गती

तपास अधिकारी गोकूळ ठाकूर यांनी दोषारोपपत्र दाखल केले. दोषारोपपत्र सादर केल्याने सुनावणीला वेग येणार आहे. याप्रकरणात एकूण ३५ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. १४ आरोपींना अटक करण्यात आली. २१ आरोपी फरार आहेत. तर, ८० जणांना नोटीस बजावण्यात आली आहे.

## एलपीजी गॅसचा काळाबाजार; गायकवाड स्थानबद्ध

✔ **सोलापूर :** सोलापूर शहरात पहिल्यांदाच अत्यावश्यक वस्तू एलपीजी गॅसचा काळाबाजार करणाऱ्या व्यक्तिविरुद्ध सोलापूर शहर पोलिसांनी एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध केले आहे. हरिदास शंकर गायकवाड (वय-५२, रा.मंजुनाथ नगर, लिमयेवाडी, सलगर वस्ती) असे आरोपीचे नाव आहे.

हरिदास गायकवाड हा सन २०२३ पासून एलपीजी गॅस इंधन म्हणून रिक्षामध्ये भरून गुन्हे करीत होता. सलगर वस्ती पोलीस ठाणे सोलापूर शहर तसेच गुन्हे शाखेकडून त्याच्यावर गुन्हे दाखल केले आहेत. त्याच्यावर २०२४ मध्ये प्रतिबंध कारवाई करण्यात आली होती. त्यानंतरही गायकवाड यांच्या वर्तनात कोणता बदल झाला नाही. पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी त्याचे स्थानबद्धतेचे आदेश निर्गमित केले. त्याला येरवडा कारागृह येथे दाखल केले आहे.सोलापूर शहर आयुक्तालयातील अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारी व्यक्ती या सदराखाली शहरातील ही पहिलीच कारवाई केली आहे.

## सोलापूर छे... नव्हे, 'शोलापूर!'

### पारा ४३ अंशाच्या उंबरठ्यावर, अक्षरश: होरपळ

✔ सोलापूर/प्रतिनिधी



मंगळवार (ता.१५) सोलापूरच्या तापमानाचा पारा ४२.८ अंश सेल्सिअसपर्यंत गेला. यंदाच्या उन्हाळ्याच्या मोसमातील हा सर्वांत उच्चांक ठरला. सर्वात उष्ण दिवस मंगळवारचा ठरला. सूर्यनारायण कोपल्याने नागरिकांसह पशु, पक्षी, प्राणी यांची अक्षरश: होरपळ झाली. असह्य उकाडा अन् तीव्र उष्णतेच्या झळांनी जिल्हावासीय हैराण झाले. तीव्र उष्णतेने सर्वच जिवांची अक्षरश: काहिली झाली.

सोलापूर शहराच्या तापमानात मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशी वाढ झाली. पारा ४३ अंशाच्या उंबरठ्यापर्यंत गेला आहे. मंगळवारी शहराचे कमाल तापमान ४२.८अंश सेल्सिअसपर्यंत गेले होते. त्यामुळे सतत तीन दिवस प्रखर उन्हामुळे सोलापूरकरांची होरपळ झाली. सोमवारी शहराचा पारा ४२.२ अंश सेल्सिअसपर्यंत गेला होता. दुसऱ्या दिवशी तापमानात ६ अंशानी वाढ होत पारा तब्बल ४३ अंशाच्या उंबरठ्यावर गेला. सूर्यनारायणाच्या प्रखर कोपामुळे सोलापूर शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागामधील जनजीवन विस्कळीत होण्याची पाळी आली आहे.

**पाण्याची पातळी खोलवर, पिके सुकू लागली**

हवेतील ओलाव्याचे म्हणजे सापेक्ष आर्द्रतेचे प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे उष्णतेची जणू लाट सोलापूर जिल्ह्यात आली आहे. उन्हाची होरपळ वाढतानाच जमिनीमधील पाण्याची पातळी वेगाने कमी होत आहे. विहिरी, बोअर यांच्यामधील पाणी आटत चालल्याने पिकांना पुरेशा प्रमाणात पाणी देणं अवघड झालं आहे. त्यातून ऊसासह सर्वच बागायती पिके सुकू लागली आहेत.

**जिल्ह्यातील बळीराजा वैतागला, शेतकऱ्यांची प्रचंड दयनीय अवस्था**

एकीकडे पाण्याचे स्त्रोत आटू लागले आहेत. विहिरी तसेच बोअरचे पाणी झपाट्याने कमी होत आहे. या प्राप्त परिस्थितीत बागायती पिकांना पाणी कसं पुरवायचं? आजवर जोपलेली पिके जगवायची कशी? असा यक्षप्रश्न आहे. त्यातच विहिरी आणि बोअरच्या पंपांच्या लाईटचा घोटाळा होत आहे. लाईट सतत ट्रीप होण्याचे प्रकार वाढले आहेत. विज पुरवठा खंडित होत असल्याने पंप बंद राहात आहेत. एकीकडे पाणी नाही, दुसरीकडे लाईटची बोंबाबोब, पुन्हा भरीस भर म्हणून शेतीपंपाना रात्रीचा वीज पुरवठा, अंधाऱ्या रात्री लाईट पुन्हा पुन्हा जाण्याचे प्रकार या सगळ्या प्रकारांनी जिल्ह्यातील बळीराजा वैतागला आहे. 'आई जेवायला घालिना अन् बाप भिक मागू देईना' अशी शेतकऱ्यांची दयनीय अवस्था झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



सीबीएसईचे घर उन्हात!

| | |
|---|---|
| संगम श्री डे | 368-75-159 |
| संगम श्री नाईट | 180-99-144 |
| कल्याण | 270-96-268 |
| मुंबई | 446-45-140 |

## सारा देश हादरला...

# सायबर गुन्हेगारांचा धुमाकूळ पुण्याच्या उद्योगपतीची पाटण्यात हत्या

- बनावट मेलने बिहारला बोलावले
- अपहरण करून शेतात डांबले
- पैसे न दिल्याने मारून टाकले

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

भारतात सायबर गुन्हेगारांचा धुमाकूळ थांबण्याऐवजी वाढतच चालला आहे. पुण्यातील एका उद्योगपतीची सायबर गुन्हेगारांनी हत्या केल्याने देशभरातील उद्योग क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून पोलीस दलही चक्रावून गेले आहे. कोथरूडमध्ये वास्तव्यास असलेले लक्ष्मण शिंदे असे हत्या झालेल्या उद्योगपतीचे नाव आहे. बनावट मेलद्वारे या गुन्हेगारांनी शिंदे यांच्या संपर्क साधला आणि त्यांना पाटण्यात बोलावून घेतले. तिथेच त्यांची हत्या करण्यात आलचे सांगण्यात येते.



गेल्या काही दिवसांपासून सायबर हल्ल्याच्या घटना सातत्याने घडताना दिसत आहेत. अनेकदा सायबर गुन्हेगार हे ओटीपी मागण्यासाठी फोन करतात. ते पैशांचे आमिष दाखवून अनेक नागरिकांना गंडा घालतात. ते आधी १० ते १२ हजार रुपये आपल्या बँक खात्यात टाकतात. पैशांचे आमिष दाखवून नंतर सर्वसामान्य नागरिकांना लुटतात. सायबर गुन्हेगारांचे असे कारनामे तर सर्वांना माहिती आहेत. पण आता या सायबर गुन्हेगारांची हिंमत आणखी वाढली आहे. या सायबर गुन्हेगारांकडून आता थेट उद्योगपतींचे अपहरण करुन त्यांची हत्या करण्यापर्यंत मजल गेली आहे. पुण्यात एका उद्योगपतींची सायबर हत्या करण्यात आल्याचे प्रकरण समोर आले आहे. कोथरुड येथे वास्तव्यास असलेले उद्योगपती लक्ष्मण शिंदे यांची हत्या झाल्याची माहिती समोर आली आहे. लक्ष्मण शिंदे यांची बिहारच्या पाटण्यात हत्याा करण्यात आली. कंपनीच्या काम ासाठी मेल करत उद्योगपतीला पाटण्यात बोलवण्यात आले. स्वस्तात मशीन मिळेल, असे सांगत लक्ष्मण शिंदे यांना आरोपींनी पाटण्यात बोलावले होते. आरोपींनी बनावट मेल आयडीद्वारे शिंदे यांच्याशी संपर्क केला होता अशी माहिती आता उघड झाली आहे.

**शिंदे हे बेपत्ता असल्याची तक्रार**

शिंदे यांचे ११ एप्रिलला संध्याकाळी त्यांच्या पत्नी रत्नप्रभा यांच्यासोबत शेवटचे बोलणे झाले होते. त्यानंतर त्यांचा संपर्क तुटला होता. कुटुंबियांनी शिंदे यांच्यासोबत संपर्क करण्याचा सातत्याने प्रयत्न केला होता. पण संपर्क होत नव्हता. त्यामुळे घाबरलेल्या शिंदे कुटुंबियांनी पोलीस ठाणे गाठत तक्रार केली होती. पुण्यातील कोथरुड पोलीस ठाण्यात शिंदे हे बेपत्ता असल्याचीदेखील तक्रार नोंदवण्यात आली होती. तपासादरम्यान सोमवारी पाटण्यात शिंदे यांचा मृतदेह आढळल्याची माहिती समोर येत आहे.

शिंदे यांची पुण्याजवळील खेड शिवापूर येथे गाड्यांमध्ये असणाऱ्या बेरिंगच्या निर्मितीची मोठी कंपनी आहे. याच बेरिंग बनवण्यासाठी एक मोठी मशीन आमच्या इथे मिळेल, असे आरोपींनी शिंदे यांना बनावट मेलद्वारे सांगितले होते. तसेच फोन करुनही शिंदे यांच्यासोबत बातचित केली होती. याच अनुषंगाने आरोपींनी शिंदे यांना पाटण्यात बोलवून घेतले.

शिंदे हे पाटण्यात गेल्यानंतर त्यांचे अपहरण करण्यात आले होते. त्यांना एका शेतात नेण्यात आले. तिथे आरोपींनी त्यांच्याकडे पैशांची मागणी केली. पण ते पैसे न मिळाल्याने आरोपींनी शिंदे यांची हत्या केली. पाटणा पोलीस या प्रकरणी तपास करत होते. पाटण्यातील ३ ते ४ जणांनी या प्रकरणी कट रचला होता.

**साडेचार लाख तक्रारी; साडेसहाशे कोटी वाचवले**

महाराष्ट्र सायबर विभागाने सहा वर्षांत साडेचार लाखांहून अधिकच्या तक्रारींत आतापर्यंत साडेसहाशे कोटी रुपये वाचवले आहेत. तर दुसरीकडे याच हेल्पलाईनमुळे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या ५० जणांचे जीव वाचवल्याचे सायबर विभागाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक यशस्वी यादव यांनी तीन दिवसांपूर्वी सांगितले होते. आता मात्र उद्योगपतीच्या हत्येने सायबर पोलिसांपुढे नवे आव्हान उभे राहिल्याचे म्हणता येईल.

**ॲपमुळे मिळणार अलर्ट**

सायबर पोलिस लवकरच त्याांची ॲप सेवा सुरू करणार आहेत. या ॲपद्वारे त्याांना एखादी लिंक सुरक्षित आहे की नाही, हे समजणार आहे. त्याामुळे हे ॲपदेखील सायबर गुन्हे रोखण्यास महत्त्वाचे ठरणार असल्याची आशा सायबर पोलिसांनी वर्तवली.

**घिबली पडू शकतो महागात**

गेल्या काही दिवसांत घिबली इमेजची वाढती क्रेझ पाहता सायबर भामट्यांनीही फसवणुकीसाठी मोर्चा वळवलेला दिसत आहे. त्याामुळे या इमेजसाठी आपली माहिती शेअर करू नका, असे आवाहन सायबर पोलिसांकडून करण्यात येत आहे. यासह ऑनलाइन तिकिटांचा काळाबाजार, सोशल मीडियावरील आक्षेपार्ह पोस्टविरुद्ध सायबर पोलिसांनी कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

CMYK